# भाग ब

## प्रत्यक्ष कर

**स्थिर आणि अंदाजित कर रचनेचे धोरण यापुढे सुरु ठेवण्यासाठी:**

- विश्वासार्ह कर रचना निर्माण करण्यासाठीची दूरदृष्टी.
- कर प्रणाली अधिक सोपी करून करविषयक विवाद कमी करणे

**नव्या 'अद्ययावत कर विवरण' पध्दतीची सुरुवात**

- अतिरिक्त कर भरणा झाल्यास अद्ययावत कर विवरण सादर करण्याची तरतूद
- आधी जाहीर करण्यास चुकून राहून गेलेले उत्पन्न जाहीर करणे करदात्यांना शक्य होणार
- संबंधित करनिर्धारिण वर्ष संपल्यापासून दोन वर्षांच्या कालावधीत कर विवरण सादर करता येणार

**सहकारी संस्था**

- सहकारी संस्थांनी भरावयाचा पर्यायी किमान कर 18.5% वरून कमी करून 15% करणार
- सहकारी संस्था आणि कंपन्या यांच्यासाठी समान पातळीची तरतूद करणे
- एकुण उत्पन्न 1 कोटी रुपयांहून अधिक आणि 10 कोटी रुपयांपर्यंत असलेल्या सहकरी संस्थावरील अधिभार 12% वरून कमी करून 7% केला

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

## दिव्यांग व्यक्तींना करात सवलत

- पालक अथवा सांभाळकर्त्याचे वय 60 वर्षे झाल्यावर विमा योजनेतून मिळणारे निवृत्तीवेतन आणि एकत्रित रकमेचा लाभ अवलंबून असलेल्या दिव्यांग व्यक्तीला देण्यात येणार

## एनपीएस अर्थात राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेतील योगदानात समानता

- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या एनपीएस खात्यामधील नियोक्त्याच्या योगदानावरील कर वजावट मर्यादा 10 टक्क्यावरून 14 टक्के करण्यात आली.
- त्यांना केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या पातळीवर आणण्यात आले आहे.
- सामाजिक सुरक्षा लाभात वाढ होण्यास मदत होणार

## स्टार्टअप्स साठी प्रोत्साहनपर मदत

- कर लाभ घेणाऱ्या पात्र स्टार्टअप्ससाठी सहभागी होण्याचा कालावधी एका वर्षाने म्हणजे 31 मार्च 2023 पर्यंत वाढविला.
- यापूर्वी हा कालावधी 31 मार्च 2022 ला संपत होता.

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

## सवलतीच्या कर रचनेअंतर्गत दिले जाणारे प्रोत्साहन

- कलम 115बीएबी अंतर्गत निर्मिती अथवा उत्पादन सुरु होण्याची शेवटची तारीख एका वर्षाने लांबवून 31 मार्च 2023 पासून वाढवून 31 मार्च 2024 करण्यात आली.

## आभासी डिजिटल मालमत्तेवर कर आकारणीची योजना

- आभासी डिजिटल मालमत्तेसाठी विशिष्ट कर रचनेची सुरुवात
- कोणत्याही आभासी डिजिटल मालमत्तेतून कोणत्याही प्रकारच्या उत्पन्नाच्या हस्तांतरणावर 30% दराने कर आकारणी

**करविषयक दाव्यांचे व्यवस्थापन**

- ज्या प्रकरणात कायदेविषयक समस्या उच्च न्यायालय अथवा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्याशी साधर्म्य साधणारी असेल अशा परिस्थितीत न्यायालयातून त्या समस्येविषयी निर्णय होईपर्यंत आयकर विभागाकडून अर्ज सादरीकरण प्रलंबित ठेवण्यात येईल.
- करदाते आणि आयकर विभाग यांच्यातील विवादांची पुनरावृत्ती कमी करण्यासाठी याची मोठी मदत होईल.

**आयएफएससी अर्थात भारतीय आर्थिक प्रणालीसाठीच्या संकेतांकासाठी कर विषयक प्रोत्साहन**

- विशिष्ट परिस्थितींमध्ये खालील बाबतीत करातून सूट देण्यात येईल
- अनिवासी भारतीय नागरिकाचे परदेशी डेरीव्हेटिव्हज सारख्या साधनांतून होणारे उत्पन्न

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

**अधिभाराचे सुसूत्रीकरण**

- एओपी AOPs (कराराची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन केलेला गट) वरच्या अधिभाराची कमाल मर्यादा 15 टक्के निर्धारित करण्यात आली आहे.

- एऔपी आणि व्यक्तिगत कंपन्या यांच्यामधली अधिभाराची विषमता कमी करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.
- कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेचे हस्तांतरण करण्यातून उत्पन्न झालेल्या दीर्घकालीन भांडवली नफ्यावरच्या
- अधिभाराची कमाल मर्यादा 15 टक्के राहील.
- स्टार्ट अप्स समुदायाला यामुळे चालना मिळेल.

<u>आरोग्य आणि शिक्षण उपकर</u>

- उत्पन्न आणि नफ्यावरच्या कोणत्याही अधिभार किंवा उपकराला व्यवसाय खर्च म्हणून परवानगी नाही.

<u>कर चुकवेगिरीला प्रतिबंध</u>

- शोध आणि सर्वेक्षण कारवाईदरम्यान आढळलेल्या अघोषित संपत्तीवर तोटा सेट ऑफ करण्यासाठी परवानगी नाही.

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

<u>उद्गम कर तरतुदींचे सुसूत्रीकरण</u>

- व्यवसाय प्रोत्साहन धोरण म्हणून एजंटकडे हस्तांतरित करण्यात आलेले लाभ, एजंटसाठी करपात्र असतील.
- वित्तीय वर्षात अशा लाभाचे मूल्य 20,000 रुपयांपेक्षा जास्त असल्यास असे लाभ देणाऱ्या व्यक्तीसाठी कर वजावटीची तरतूद